कला अकादमी गोवा
पणजी-गोवा
कअ/कविवि/संनाम/२०१८-१९/
दि.१९/१०/२०१८

# कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमीने यंदाच्या संगीत नाटक महोत्सवात सहभागी होण्यासाठी इच्छुक संस्थांकडून प्रवेशिका मागविल्या असून त्या प्रवेशिका उशिरात उशिरा म्हणजे २ नोव्हेंबर २०१८ पर्यंत कला अकादमीच्या कार्यालयात दाखल करणे आवश्यक आहे. निर्धारित नमुन्यातील प्रवेशिका कला अकादमीच्या कार्यक्रम व विकास विभागात कार्यालयीन कामकाजाच्या वेळात विनामुल्य उपलब्ध आहेत.

सहभागी होणा-या संस्थेची १८६० च्या संस्था नोंदणी कायद्यांतर्गत अधिकृतरित्या नोंदणी होऊन वेळोवेळी नूतनीकरण झालेले असणे आवश्यक असून प्रवेशिकेसोबत रु.१०००/- ची अनामत रक्कम भरणे गरजेचे आहे.

सदर महोत्सवात एकूण नऊ (९) नाटकांची निवड केली जाणार असून तत्पुर्वी अकादमीने नेमलेल्या निरिक्षक मंडळाकरवी नाटकांची प्रत्यक्ष तालिम पाहून ही निवड करण्यात येईल. तालमीसाठी प्रत्येक संस्थेला येण्या-जाण्याचा एका वाहनाचा प्रवास खर्च अकादमीच्या नियमाप्रमाणे व निर्धारीत केलेल्या प्रति कि.मी. दरानुसार देण्यात येईल.

प्रवेशिका दाखल केलेल्या संस्थांनी तालमीसाठी संपूर्ण नाटक नाटयगीतांच्या उत्स्फूर्त ताना-आलापींसह पूर्ण बसविणे अत्यंत आवश्यक आहे. त्यावेळी नाटकातील कुठल्याही प्रवेशाचे सादरीकरण निरीक्षकांच्या सूचनेनुसार सादर करावे लागेल. तालमीत सहभागी होणा-या कलाकार व संगीत साथीदारांनाच अंतिम महोत्सवात सहभागी व्हावे लागेल.